SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

(असाधारण)

बुधवार, दिनांक २ जून, २०२१

अधिसूचना

क्र. ५३/२०२१ दिनांक ï २. ६.२०२१

विषय : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.....अधिष्ठाता तदर्थ नामनिर्देशनाबाबत.

संदर्भ : १) असाधारण अधिसूचना क्र.३०/२०१८, दि.१३.४.२०१८
२) असाधारण अधिसूचना क्र.३५/२०१९, दि.१६.४.२०१९
३) असाधारण अधिसूचना क्र.४०/२०२०, दि.२०.४.२०२०
४) अधिसूचना क्र.४/२०२१, दि.७.१.२०२१
५) असाधारण अधिसूचना क.४०/२०२१, दि.१६.४.२०२१

संदर्भीय क्र.१) वरील अधिसूचनेमध्ये उल्लेखित विद्यापीठ प्रस्ताव व त्यानुषंगाने मा.कुलपती कार्यालयीने दिलेल्या मान्यतेच्या अधीन राहून अधिसूचनेतील उल्लेखित विद्याशाखांकरिता (वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा आणि आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा) अधिष्ठात्यांचे तदर्थ नामनिर्देशन करण्यात आले होते.

तथापि, डॉ. सौ. एम.पी. काळे, प्राध्यापक, पद.शैक्षणिक गृहविज्ञान विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ ह्या नियम वयोमानानुसार दि.३१.१२.२०२० रोजी विद्यापीठाच्या सेवेतून सेवानिवृत्त झाल्यामुळे संदर्भीय क्र.४ वरील अधिसूचनेच्या माध्यमातून प्रा. डॉ. वैशाली गुडधे, प्राध्यापक, पद. शैक्षणिक ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमारवती विद्यापीठ यांना आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या तदर्थ अधिष्ठाता पदावर नामनिर्देशित केले आहे.

संदर्भ क्र.५ वरील अधिसूचनेनुषंगाने डॉ.डी.डब्ल्यु.निचीत यांना दि.१३.४.२०२१ पासून वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेकरिता तदर्थ अधिष्ठाता पदावर पुनःश्च नामनिर्देशित करण्यात आले आहे.

तथापि, संदर्भीय क्र.४ व ५ वरील अधिसुचनेच्या माध्यमातून अधिसूचनेमध्ये उल्लेखित आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा आणि वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखांसमोर दर्शविलेले तदर्थ अधिष्ठाते, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १५(३) च्या परंतुकाअंतर्गत मा. हंगामी कुलगुरूंनी सदर्हू विद्याशाखांच्या शैक्षणिक कामकाजामध्ये अडथळा निर्माण होवू नये म्हणून दि.२.६.२०२१ पासून नव्याने नामनिर्देशन होईपर्यंत किंवा नवीन अधिष्ठात्यांची नियुक्ती होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल अशा कालावधीसाठी नामनिर्देशनाला मान्यता प्रदान केली आहे.

स्वा/-
(डॉ.तुषार देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ